| MHKO110018052022 | नियमित दिवाणी दावा क्र. २३२/२०२२ मधील<br>निशाणी क्रमांक ८० खालील आदेश<br>रंगराव महादेव माने वगैरे<br>विरुध्द<br>लक्ष्मी खंडेराव कोळी वगैरे |
|---|---|

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज हा महत्वाची कागदपत्रे दाखल करण्यासाठी केलेला आहे. सदर अर्जावर प्रतिवादींनी त्यांचे म्हणणे दाखल केले आहे.

२. वादींचे असे कथन आहे की, सदर कामी काही महत्वाची कागदपत्रे दाखल केलेली आहेत. सदरील कागदपत्रे न्यायाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाची असल्याने न्यायालयाच्या कामी हजर करून घेणे महत्वाचे असलेने वादींनी सदर अर्ज मंजुर करण्याची विनंती केली आहे. प्रतिवादी यांनी सदर अर्जास विरोध करून कायदेशीर तरतुदीनुसार योग्य तो आदेश करण्याची विनंती केली आहे.

३. वादी तर्फे युक्तीवाद ऐकला. अभिलेखाची पाहणी केली. वादी यांनी सदर दावा हा हक्कज्ञापन व कायम मनाई करिता दाखल केलेला आहे. सदर प्रकरण हे नि. ५ च्या युक्तिवादा करिता प्रलंबित आहे. सदर प्रकरणात मुद्दे काढलेले नाहीत. वादी यांनी सदरच्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांचा विचार केला असता सदरील कागदपत्रे दाखल करुन घेतल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी यांना सदर कागदपत्रांवर उलटतपास घेण्याची संधी उपलब्ध आहे. म्हणून सदर अर्ज नामंजूर करणे संयुक्तीक वाटत नाही. सबब, मी खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

# <u>आदेश</u>

१. अर्ज अशंत:मंजूर करण्यात येतो.

२. सदर कामी कागदपत्रे दाखल करण्यास परवानगी देण्यात येते.

sd/-
( आर. एस. मोरे )
३रे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
पेठवडगाव

दिनांकः- १३/११/२०२५
पेठवडगाव